जनसंपर्क कक्ष

0 8 MAY 2026 तरुण भारत शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर



कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठात राजर्षी छत्रपती शाहू महाराज यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन करताना कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे, डॉ. अवनीश पाटील, डॉ. देविकाराणी पाटील, आदी.

# शिवाजी विद्यापीठात राजर्षी शाहूंना अभिवादन

प्रतिनिधी, कोल्हापूर

शिवाजी विद्यापीठात राजर्षी छत्रपती शाहू महाराज यांच्या स्मृतिदिनानिमित्त त्यांच्या पवित्र स्मृतींना अभिवादन करण्यात आले. शिवाजी विद्यापीठाच्या प्रभारी प्र–कुलगुरू डॉ. ज्योती जाधव यांनी बुधवारी सकाळी राजर्षी शाहू समाधी स्थळ व दसरा चौक येथील राजर्षी शाहू महाराज यांचा पुतळा या दोन्ही ठिकाणी पुष्प वाहून महाराजांच्या स्मृतींना अभिवादन केले. विद्यापीठाच्या राजर्षी शाहू संशोधन व विकास केंद्रामध्ये कुलसचिव डॉ. विलास शिंदे यांच्या हस्ते राजर्षी शाहू महाराज यांच्या प्रतिमेस पुष्पहार घालून अभिवादन करण्यात आले. यावेळी इतिहास अधिविभागाचे प्रमुख डॉ. अवनीश पाटील, डॉ. देविकाराणी पाटील, डॉ. आलोक जत्राटकर, डॉ. खिलारे, अविनाश भाले, डॉ. हत्तीकट, सचिन घोरपडे, यश आंबोळे उपस्थित होते.

0 8 MAY 2026
सकाळ

# विविध अभ्यासक्रमांसाठी सोमवारपासून प्रवेश परीक्षा

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठातर्फे शैक्षणिक वर्ष २०२६-२७ साठी विविध पदव्युत्तर आणि व्यावसायिक अभ्यासक्रमांच्या प्रवेश परीक्षा सोमवार (ता. १२ मे) ते १५ मे दरम्यान विविध सत्रांत होणार आहेत. कोल्हापूर, सांगली, सातारा जिल्ह्यांतील एकूण १५ केंद्रांवर परीक्षा होईल. एम.एस्सी.(बॉटनी), बी.लिब., इलेक्ट्रॉनिक्स अशा विविध ४० अभ्यासक्रमांसाठी सकाळी साडेदहा ते दुपारी बारा, दुपारी एक ते अडीच आणि दुपारी साडेतीन ते सायंकाळी पाच अशा सत्रांमध्ये परीक्षा होणार आहेत. एकूण २ हजार ७७९ जागांसाठीच्या परीक्षेकरिता ३ हजार ५७८ विद्यार्थ्यांनी नोंदणी केली आहे. या विद्यार्थ्यांनी वेळापत्रक आणि परीक्षेबाबतच्या सूचनांची माहिती विद्यापीठाच्या संकेतस्थळावरून घ्यावी. त्यांनी परीक्षा केंद्रावर वेळेपूर्वी उपस्थित राहावे, असे आवाहन परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक डॉ. अजितसिंह जाधव यांनी केले.

0 8 MAY 2026
तरूण भारत

# पदवी, पदव्युत्तर परीक्षा निकाल जाहीर

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठाच्या मार्च, एप्रिल २०२६ उन्हाळी सत्रातील पदवी व पदव्युत्तर परीक्षेतील गुरूवारी ६ अभ्यासक्रमाचे निकाल जाहीर करण्यात आले आहेत. आज अखेर ११८ अभ्यासक्रमांचे निकाल जाहिर करण्यात आले आहेत. गुरुवारी विविध ७५ अभ्यासक्रमांच्या परीक्षा वर्णनात्मक पध्दतीने १५७ परीक्षा केंद्रावर पार पडल्या. परीक्षांसाठी ४४ हजार ७४ विद्यार्थी उपस्थित होते. विद्यापीठाने परीक्षेत गैरप्रकार करणाऱ्या विद्यार्थ्यांवर नियंत्रण ठेवण्यासाठी भरारी पथके स्थापन केली आहेत. गुरूवारी सातारा जिल्ह्यातून एका गैरप्रकाराची प्रत्यक्ष नोंद करण्यात आली आहे.

0 8 MAY 2026
पुढारी

# उन्हाळी सत्रातील अभ्यासक्रमांचे निकाल जाहीर

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

शिवाजी विद्यापीठाच्या मार्च-एप्रिल उन्हाळी सत्रातील आजअखेर ११८ अभ्यासक्रमांचे निकाल घोषित झाले आहेत. सध्या विद्यापीठ संलग्न महाविद्यालयांत पदवी व पदव्युत्तर अभ्यासक्रमाच्या परीक्षा सुरू आहेत. गुरुवारी बी.कॉम., बीए, बीबीए, बीएससी, बॅचलर ऑफ लॉ (पाच वर्ष), बॅचलर ऑफ डिझाईन, डिप्लोमा इन इन्स्ट्रुमेंटल म्युझिक, बीएड., एमएड., पीजीडीसीए आदी ७५ अभ्यासक्रमांच्या परीक्षा वर्णनात्मक पद्धतीने १५७ केंद्रांवर झाल्या.

दि. ७ रोजी एम.कॉम., बीएस्सी. (पर्यावरणशास्त्र) आदी सहा अभ्यासक्रमांचे निकाल जाहीर करण्यात आले. आजअखेर ११८ अभ्यासक्रमांचे निकाल घोषित झाले आहेत. भरारी पथकाकडून सातारा जिल्ह्यातून एका गैरप्रकाराची नोंद परीक्षा प्रमाद समितीमार्फत करण्यात आली आहे, अशी माहिती परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक डॉ. अजितसिंह जाधव यांनी दिली.